# युतीला स्पष्ट बहुमत तर आघाडीचा सुपडासाफ

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महापालिकेच्या ६८ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांनी २७ जागांवर विजय मिळवत सर्वाधिक जागा पटकावल्या आहेत.

भाजपने २५ जागांवर यश मिळवत दुसरा क्रमांक मिळवला आहे. शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाने १० जागा मिळवत उपस्थिती नोंदवली आहे. काँग्रेस व एमआयएम यांनी प्रत्येकी २ जागा मिळवल्या असून शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि बसपाला प्रत्येकी १ जागा मिळाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), मनसे, समाजवादी पार्टी तसेच अपक्षांना एकही जागा मिळाली नाही.



**बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक**

१. कुमारसिंह वाकळे (राष्ट्रवादी)
२. प्रकाश भागनागरे (राष्ट्रवादी)
३. करण कराळे (भाजप)
४. सोनाबाई शिंदे (भाजप)
५. पुष्पा अनिल बोरूडे (भाजप)

**प्रभाग १**
अ सागर बोरूडे (राष्ट्रवादी)
ब शारदा ढवन (भाजप)
क दिपाली बारस्कर (राष्ट्रवादी)
ड संपत बारस्कर (राष्ट्रवादी)

**प्रभाग २**
अ रोशनी भोसले (भाजप)
ब महेश तवले (राष्ट्रवादी)
क संध्या पवार (राष्ट्रवादी)
ड निखिल वारे (भाजप)

**प्रभाग ३**
अ योगीराज गाडे (उबाठा)
ब ज्योती गाडे (राष्ट्रवादी)
क गौरी बोरकर (राष्ट्रवादी)
ड ऋग्वेद गंधे (भाजप)

**प्रभाग ४**
अ शेख शहेनाज खालिद (एमआयएम)
ब सय्यद शहाबाज अहमद (एमआयएम)
क खान मिनाज जाफर (काँग्रेस)
ड खान शम्स समीउल्ला (काँग्रेस)

**प्रभाग ५**
अ काजल भोसले (राष्ट्रवादी)
ब धनंजय कृष्णा जाधव (भाजप)
क हरिप्रीतकोर गंभीर (राष्ट्रवादी)
ड मोहित पंजाबी (राष्ट्रवादी)

**प्रभाग ६**
अ मनोज दुलम (भाजप)
ब सोनाबाई तायगा शिंदे (भाजप)
क सुनीता कुलकर्णी (भाजप)
ड करण उदय कराळे (भाजप)

**प्रभाग ७**
अ वर्षा सानप (भाजप)
ब पुष्पा अनिल बोरूडे (भाजप)
क वंदना विलास ताठे (भाजप)
ड बाबासाहेब वाकळे (भाजप)

**प्रभाग ८**
अ सुनीता भिंगारदिवे (राष्ट्रवादी)
ब आशा कातोरे (भाजप)
क नवनाथ कातोरे (शिवसेना शिंदे)
ड कुमार वाकळे (राष्ट्रवादी)

**प्रभाग ०९**
अ संजय शेंडगे (शिवसेना शिंदे)
ब रुपाली दातरंगे (शिवसेना शिंदे)
क वैशाली नळकांडे (शिवसेना शिंदे)
ड महेश लोंढे (भाजप)

**प्रभाग १०**
अ श्रीपाद शंकर छिंदम (बसपा)
ब शितल अजय ढोणे (भाजप)
क मयुरी सुशांत जाधव (भाजप)
ड सागर राजु मुर्तडकर (भाजप)

**प्रभाग ११**
अ उमेश खंडेराव कवडे (शिवसेना शिंदे गट)
ब सुनिता संतोष गणप्पा (शिवसेना शिंदे गट)
क आशा किशोर डागवले (राष्ट्रवादी)
ड सुभाष सोपानराव लोंढे (भाजप)

**प्रभाग १२**
अ मंगल सुनील लोखंडे (शिवसेना)
ब सुरेखा संभाजी कदम (शिवसेना)
क बाळासाहेब बोराटे (शिवसेना)
ड दत्तात्रय कावरे (शिवसेना)

**प्रभाग १३**
अ सुरेश बनसोडे (राष्ट्रवादी)
ब सुजाता महेंद्र पडोळे (राष्ट्रवादी)
क अनिता विपुल शेटिया (राष्ट्रवादी)
ड अविनाश हरिभाऊ घुले (राष्ट्रवादी)

**प्रभाग १४**
अ प्रकाश भागनागरे (राष्ट्रवादी)
ब सुनिता भगवान फुलसौंदर (राष्ट्रवादी)
क मिना संजय चौपडा (राष्ट्रवादी)
ड गणेश कुंडलिक भोसले (राष्ट्रवादी)

**प्रभाग १५**
अ पौर्णिमा गव्हाळे (राष्ट्रवादी)
ब दत्तात्रय गाडळकर (भाजप)
क गितांजली काळे (राष्ट्रवादी)
ड सुजय मोहिते (भाजप)

**प्रभाग १६**
अ सविता कांबळे (राष्ट्रवादी)
ब वर्षा काकडे (राष्ट्रवादी)
क विजय पठारे (भाजप)
ड ज्ञानेश्वर येवले (भाजप)

**प्रभाग १७**
अ मयुर बांगर (राष्ट्रवादी)
ब अश्विनी लोंढे (राष्ट्रवादी)
क कमल कोतकर (भाजप)
ड मनोज कोतकर (भाजप)

## गीता पाऊलबुधे यांचे निधन



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगरचे माजी आमदार दिवंगत डॉ. ना. ज. पाऊलबुधे यांच्या पत्नी गीता नाथ पाऊलबुधे यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले.

उद्या शनिवार, ता. १७ जानेवारी रोजी सकाळी ९.३० वाजता अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. विनय, माजी नगरसेवक विनीत तसेच शिक्षण संस्थेचे संचालक देवदत्त पाऊलबुधे यांच्या त्या मातोश्री होत.

## १९ जानेवारीला आरोग्य तपासणी शिबीर

**अहमदनगर । रयत समाचार**

एकदंत गणेश मंदिरतर्फे सोमवार, ता. १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत दातरंगे मळा, एकदंत कॉलनी, अहिल्यानगर येथे मोफत नेत्र, दंत व आरोग्य तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व औषध वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



आज संगणक, टीव्ही व प्रदूषणामुळे डोळ्यांवर व आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. काही शहरी व ग्रामीण भागात डोळ्यांची व आरोग्याची निगा राखण्यामध्ये जनतेचे दुर्लक्ष होत चालले आहे. त्यातच मोतीबिंदूसारख्या सुमारे १५ ते २० हजार रुपयांच्या शस्त्रक्रिया सामान्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात. म्हणून हे शिबीर आयोजित केले आहे. एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या सहकार्याने हे शिबीर होणार आहे. नेत्रतपासणीपासून ते मोतीबिंदूपर्यंतचे सर्व सोपस्कार मोफत करण्यात येणार आहेत. यामध्ये रुग्णांचा नगर ते पुणे प्रवास, भोजन, निवास व काळा चष्मा आदी बाबींचा समावेश आहे. शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आलेल्या रुग्णांवर पुण्यात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच मोफत आरोग्य व दंत तपासणी व औषध वाटप शिबीरात तज्ज्ञ डॉ. शाम गुरुड, डॉ. प्रशांत सुरकुटला, डॉ. रत्ना बल्लाळ, डॉ. योगेश मंचे, डॉ. प्रतिक्षा कोडम हे डॉक्टर रुग्णांची तपासणी करून योग्य ते मार्गदर्शन करून औषधे वाटप करणार आहेत. रुग्णांनी शिधा पत्रिकेची झेरॉक्स प्रत सोबत आणावी, तसेच सध्या सुरू असलेली औषधे व गोळ्याही बरोबर आणाव्यात. रुग्णांसाठी नावनोंदणी आवश्यक असून विनोदा बेत्ती (मो. ९२७०६८४७४१), स्वाती गाजेंगी (मो. ७२७६८८७४८१), ओंकार बुरगुल (मो. ८६०५१६७७६८), यश मंचे (मो. ८४८५८४७६६०), एच. व्ही. देसाई रुग्णालयाचे शुभम बोज्जा (मो. ९०२८४४०४०४) यांच्याशी संपर्क साधावा. तरी रुग्णांनी या मोफत तपासणी शिबीराचा व शस्त्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या सर्व कार्यकर्त्यांनी केले आहे.



**संक्रांती ते रथसप्तमी या काळात लहान मुलांचे उत्तम आरोग्य व बदलत्या ऋतूचा परिणाम होऊ नये म्हणून बोर, उसाचे तुकडे व भुईमुगाच्या शेंगा डोक्यावर टाकून १० महिन्यांच्या गौरांश या शिशुला शहरातही परंपरेनुसार बोरन्हाण घालताना सुवासिनी.**

**(छाया : विजय मते)**



## जिजाऊ जयंतीनिमित्त वृक्षलागवड; प्रभाकरम फाऊंडेशनचा उपक्रम

**अहमदनगर । नरहरी शहाणे**

राजमाता जिजाऊ जयंतीच्या पावन दिनाचे औचित्य साधून प्रभाकरम फाऊंडेशनच्या वतीने केडगाव परिसरात वृक्षलागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत विविध देशी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन व भावी पिढीसाठी हिरवळ जपण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. राजमाता जिजाऊ यांचे सामाजिक कार्य, राष्ट्रप्रेम व संस्कारांची प्रेरणा लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प सर्वांनी केला. प्रभाकरम फाऊंडेशन समाजोपयोगी, पर्यावरणपूरक व जनजागृतीचे विविध उपक्रम सातत्याने राबवत असून भविष्यातही असे उपक्रम सुरू ठेवावेत, असे स्थानिकांनी सांगितले. यावेळी रविंद्र टकले, फाऊंडेशनचे अध्यक्ष विपुल तापकीर, उपाध्यक्ष अभिषेक थोरात, भाऊ घुले, शिवम थोरात, श्रीकर कुलकर्णी, निखिल बहिरट व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## स्नेहालय संचलित ‘रेडिओ नगर’चा वर्धापन दिन उत्साहात

### बाळासाहेब देशमुख यांचा विदेशी कलाकाराकडून सन्मान





**अहमदनगर । रयत समाचार**

स्नेहालय संचलित रेडिओ नगर एफएम केंद्राचा १५ वा वर्धापन दिन प्रसिद्ध साहित्यिक माधव मनोहर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून दै. सकाळचे संपादक प्रकाश पाटील, माध्यम व डॉक्युमेंटरी तज्ञ जॉन कोस्टर, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख यांनी केले. या वर्धापन दिनानिमित्त रेडिओ नगरचे अंतर्गत कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचा यु.के. येथील कलाकार व व्हॉइस आर्टिस्ट लॉरेन होजसन यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. रेडिओ नगर एफएम केंद्रावर ‘पुस्तकांच्या पानावरून’ या कार्यक्रमांतर्गत बाळासाहेब देशमुख यांच्या प्रबोधनपर, संस्कारक्षम अशा ५१ कथा प्रसारित झाल्या असून, त्या योगदानाबद्दल हा सन्मान देण्यात आला. बाळासाहेब देशमुख यांनी आजवर अहिल्यानगर आकाशवाणी, बीड आकाशवाणी, रेडिओ नगर एफएम केंद्र आदी ठिकाणी १०० पेक्षा अधिक कथाकथन प्रयोग सादर केले आहेत. या कार्यक्रमास स्नेहालयचे प्रमुख डॉ. गिरीश कुलकर्णी, साहित्यिक सतीश डेरेकर, ज्येष्ठ पत्रकार विजयसिंह होलम, ज्येष्ठ लेखक शब्बीर शेख, कलावंत अनंत द्रविड यांच्यासह अनेक उद्योजक, पत्रकार व कलावंत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप क्षीरसागर यांनी केले. अंशुमन सब्बन, संजय पारनाईक, राजीव गुजर व डॉ. प्रीती भोंबे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले. याप्रसंगी ‘यशस्वी होताना माझा प्रवास’ या पुस्तकाचे प्रकाशन तसेच ‘फिटे अंधाराचे जाळे’ या ऑडिओचे लॉन्चिंग मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकिजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
**- संपर्क -**
**९०११११३७००**

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)




# श्रीगोंद्यात २६५ वा पानिपत शौर्य दिन साजरा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

तिसऱ्या पानिपत युद्धासाठी शिंदे घराण्याचे अनेक सरदार आणि हजारो सैन्य श्रीगोंदयातील पूर्वेकडील दिल्ली वेशीतून येथील राजवाड्यातील जोधपूर मारुतीचे दर्शन घेऊन उत्तरेकडे देशाच्या रक्षणासाठी पानिपत लढाईला गेले. परंतु ते परत कधीच माघारी आले नाही. म्हणून या वेशीला अपशकुनी वेस म्हणून संबोधले जायचे. मात्र १४ जानेवारी १७६१ रोजी पानिपत रणभूमीवर मराठ्यांनी जे शौर्य गाजवले त्याची तुलना कोणत्याच लढाईशी करता येणार नाही. महाराष्ट्रातील प्रत्येक घराण्यातील तरुण पानिपतावर कामी आला. देशरक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देत धारातीर्थी पडलेल्या सर्व मराठा वीर योद्ध्यांनी पराक्रमाची शर्थ केली. मराठे हारले, पण या युद्धानंतर भारतावर परकीय आक्रमण करण्याची पुन्हा हिम्मत कोणी केली नाही. म्हणून शिवदुर्ग वारसा संवर्धन समिती १४ जानेवारी हा पानिपत शौर्य दिन म्हणून गेल्या पाच वर्षांपासून साजरा करीत आहे.फ श्रीगोंदा आणि पानिपत यांचा घनिष्ट संबंध आहे. श्रीगोंदयाची ऐतिहासिक दिल्ली वेस पानिपत युद्धानंतर अपशकुनी वेस म्हणून ओळखली जाऊ लागल्याने पुढे या वेशीतून कोणतेही शुभकार्य करण्यासाठी कोणीही जात नसत. परंतु शिवदुर्ग वारसा संवर्धन समिती, सरदार जानराव वाबळे परिवार व शिवतारा प्रतिष्ठाण, शिवदुर्ग ट्रेकर्स फाऊंडेशन, महाराष्ट्र, बारव मोहिम टीम, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने या वेशीचे जतन व संवर्धन करून १४ जानेवारी २०२६ रोजी २६५ वा पानिपत शौर्य दिन २६५ दिवे लावून 'दीपोत्सव'द्वारे तिसऱ्या पानिपत युद्धातील शौर्यवीरांना अभिवादन करण्यात आले. तसेच या अपशकुनी दिल्ली वेशीचे 'पानिपत शौर्य वेस' असे नामकरण करण्यात आले.

# ससाणेंच्या दूरदृष्टीने बसस्थानकाचा कायापालट

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

वापरलेले चहाचे कप, प्लास्टिक पिशव्या, घाण रद्दी, भेळीचे कागद, गुटखा पुड्या यासह इतरही मोठ्या प्रमाणातील घानीचा निपटारा श्रीरामपूर नगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून करण्यात आला आहे.

नूतन नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या दूरदृष्टीचा हा साक्षात्कार असून बसस्थानकस्वच्छतेमुळेचकाकले आहे. '' इच्छा असेल तर मार्ग सापडेल, या उक्तप्रमाणे नवनिर्वाचित नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या सूचनेनुसार श्रीरामपूर बसस्थानकाची संपूर्णपणे स्वच्छता करण्यात आली आहे. या कामगिरीमुळे नागरिकांनी ससाणे यांना धन्यवाद दिले आहेत. यापूर्वी गेल्या कित्येक वर्षांपासून श्रीरामपूर बसस्थानकाची अशा पद्धतीने स्वच्छता झाली नव्हती. सर्वत्र पसरलेला कचरा कागदाचे तुकडे, प्लास्टिक ग्लास, चहाचे वापरलेले ग्लास, वापरलेली रद्दी अशा वेगवेगळ्या घाणीने श्रीरामपूर चे हे




बसस्थानक पूर्णपणे माखले गेले होते. बसस्थानकात आरोग्य कर्मचारी साफसफाईसाठी उपलब्ध असले तरी त्यांच्याकडून संपूर्ण स्वच्छता होणे अशक्य असते. नगराध्यक्ष करण ससाने यांनी बसस्थानकाची ही दुर्दशा पहिली आणि नगरपालिकेचे आरोग्य विभाग प्रमुख रावसाहेब घायवट यांना या संदर्भात सूचना केली. श्री घायवट यांनी क्षणाचाही विलंब न करता शहरातील स्वच्छते वर परिणाम होणार नाही याची दक्षता घेत या बसस्थानकाची कोपरा न कोपरा स्वच्छता केली आहे. श्री घायवट यांनी देखील समय सूचकता पाळत या बसस्थानकाची स्वच्छता केल्याने बसस्थानक चकाचक दिसू लागले आहे. नगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे स्मारक ५० कर्मचारी या स्वच्छतेसाठी तैनात करण्यात आले होते. अत्यंत बारकाईने या बसस्थानकाचा संपूर्ण परिसर तसेच प्रत्येक कोपरा पूर्णतः स्वच्छ करण्यात आला आहे. यामुळे बसस्थानकाला झळाळी मिळाली आहे. या बसस्थानकाचा जिल्ह्यासह पर जिल्ह्यातून प्रत्येक तालुक्यातून खेड्यापाड्यातून महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी ये जा करतात. तालुक्याचे ठिकाण म्हणून या बसस्थानकाला सर्वाधिक गर्दी असते. मात्र घाणीच्या साम्राज्यामुळे तेथे फार प्रवासी थांबू शकत नव्हते. नगराध्यक्ष करण ससाने आरोग्य विभागाचे प्रमुख रावसाहेब घायवट आणि त्यांचे सर्व कर्मचारी यांच्या या दूरदृष्टी मुळे शेकडो प्रवाशांना मोठा दिलासा आणि आधार मिळाला आहे. दरम्यान बसस्थानका सह शहरातील प्रत्येक रस्ता न रस्ता देखील अतिशय बारकाईने स्वच्छ करण्यात आले आहेत. यामुळे शहरातील कचऱ्यामुळे शहराला प्राप्त झालेले रौद्ररूप पुसले गेले आहे. नगराध्यक्ष करण ससाणे यांच्या या स्वच्छतेच्या उपक्रमाबद्दल नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# दहीगाव-ने येथे हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

दहीगाव-ने येथे मकर संक्रांतीचे औचित्य साधत डॉ. क्षितिज घुले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात व जल्लोषात पार पडला. उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध व्यवस्था आणि सामाजिक जाणिवेचा आदर्श ठरलेला हा कार्यक्रम उपस्थित महिलांसाठी विशेष आकर्षण ठरला. या कार्यक्रमास राजश्री चंद्रशेखर घुले, तेजस्विनी क्षितिज घुले तसेच युगंधरा क्षितिज घुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला. हळदी-कुंकू, आकर्षक भेटवस्तू व स्नेहपूर्ण वातावरणात महिलांचा सन्मान करण्यात आला. महिलांच्या उत्स्फूर्त सहभागातून सामाजिक ऐक्य, संस्कृती आणि परंपरेचा सुंदर संगम




या कार्यक्रमातून दिसून आला. मकर संक्रांतीची परंपरा जपत महिलांच्या सन्मानाचा संदेश देणारा हा उपक्रम विशेष उल्लेखनीय ठरला. छत्रपती शिवाजी महाराज तरुण मित्र मंडळ व राजमाता जिजाऊ महिला मंडळ, दहीगाव-ने यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांसह उपस्थित महिलांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले. डॉ. क्षितिज घुले यांचा वाढदिवस यावेळी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी सरपंच राजू पाऊलबुद्धे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष राजेंद्र तांबे, रामकीसन जाधव, सुभाष पवार, बाळासाहेब मरकड, सुभाष पानसरे, अमोल गर्जे, कुमार मरकड, संदीप घुले, माऊली आहेर, प्रितम टाक, कृष्णा मोरे, गौरव काशीद, अक्षय ओहाळे, सतीश टाक, अक्षय काशीद, अरुण चव्हाण, बंडू भुमकर, अण्णासाहेब गर्जे, डॉ. संदीप आहेर, भाऊसाहेब तांबे, बाळासाहेब टाक, भाऊसाहेब ठोकळ, आसाराम ओहळे, नारायण मरकड, बाळासाहेब काशीद, बाळासाहेब गर्जे, संतोष टाक यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे महिलांचा सन्मान वृद्धिंगत होऊन समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# खरेदी-विक्री संघाच्या व्हा.चेअरमनपदी साईनाथ नवले

**अकोले । सतीश पाचपुते**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अकोले तालुक्यातील पदाधिकारी तथा युवा कार्यकर्ते साईनाथ नवले यांची अकोले तालुका खरेदी-विक्री संघाच्या व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाली आहे. खरेदी-विक्री संघाचे व्हाईस चेअरमन माधवराव तिटमे यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी निवड प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी अमोल वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. व्हाईस चेअरमनपदासाठी साईनाथ नवले यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी चेअरमन प्रकाश नाईकवाडी, संचालक माधवराव तिटमे, विठ्ठल कुमकर, दगडू डोंगरे, मधुकर बिन्नर, दत्तात्रय कोटकर,



निलेश तळेकर, भाऊसाहेब कासार, नानासाहेब नाईकवाडी, चंदर बांडे, कुमुदिनी पोखरकर, मंदाकिनी नाईकवाडी, त्रिंबक आवारी, अरुण फापाळे, सयाजीराव पोखरकर, व्यवस्थापक बाळासाहेब जगधने आदी उपस्थित होते. साईनाथ नवले हे अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सक्रिय पदाधिकारी असून त्यांनी काँग्रेस पक्षाकडून खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीतील संचालकपदासाठी अर्ज दाखल केला होता. संघटन कौशल्य चांगले असून मागील वर्षभरात त्यांनी संघाच्या कारभारात संचालक म्हणून सक्रिय लक्ष घातले होते. ते बुवासाहेब नवले पतसंस्थेचे संचालक असून सहकार क्षेत्रातील त्यांचा अनुभव दांडगा आहे. युवक काँग्रेसच्या माध्यमातून तालुक्यात युवकांचे जाळे उभे करण्यात त्यांचा वाटा राहिला असून युवक काँग्रेसचे नेते विक्रम नवले यांचे ते खंदे समर्थक म्हणून ओळखले जातात. या निवडीबद्दल आ. डॉ. किरण लहामटे, ज्येष्ठ नेते मधुकर नवले, सीताराम गायकर, रमेश जगताप, विक्रम नवले, गिरिजा पिचड, शिवाजी नेहे, चेअरमन प्रकाश नाईकवाडी, सर्व संचालक मंडळ व मित्रमंडळाने त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



# उखलगावात 'अभ्यासाचा भोंगा' उपक्रम; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज योजना अंतर्गत उखलगाव ग्रामपंचायतीच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची शिस्त निर्माण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ''अभ्यासाचा भोंगा'' या अभिनव उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गावात दररोज संध्याकाळी ठीक ७.०० वाजता अभ्यासाचा भोंगा वाजवण्यात येत असून, संध्याकाळी ७ ते ९ हा वेळ केवळ अभ्यासासाठी राखून ठेवण्याचे आवाहन ग्रामपंचायतीने केले आहे. या वेळेत मोबाईल व टीव्ही बंद ठेवून मुलांनी शांतपणे अभ्यास करावा, असे आवाहन पालकांना करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या प्रारंभानंतर ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी गावात पाहणी केली असता बहुसंख्य घरांमध्ये विद्यार्थी शांतपणे अभ्यास करताना दिसून आले. हे चित्र समाधानकारक असून पालकांचा सकारात्मक सहभाग, मुलांची शिस्त आणि गावाची एकजूट यांचे दर्शन घडले. या उपक्रमाबाबत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व ग्रामस्थांचे मनापासून आभार मानले. अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना छोटी बक्षिसे देऊन प्रोत्साहन देण्याची सूचनाही काही ग्रामस्थांकडून मांडण्यात आली आहे. दरम्यान, शिक्षक, ग्रामपंचायत सदस्य, युवक व ग्रामस्थांची एक मार्गदर्शक टीम घरोघरी भेटी देत पालक व विद्यार्थ्यांना समुपदेशन तसेच अभ्यासासाठी प्रोत्साहन देत आहे. या अभिनव उपक्रमाचे माननीय गटविकास अधिकारी राणी फराटे व विस्तार अधिकारी यादव यांनी विशेष कौतुक केले असून हा उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. ''आज अभ्यासाची शिस्त, उद्या यशाची खात्री'' या संदेशासह सुरू झालेला हा उपक्रम उखलगावच्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी दिशादर्शक ठरत असल्याचे ग्रामस्थांनी मत व्यक्त केले आहे.

# श्रीरामपूरला आज भव्य जीएसटी मार्गदर्शन शिबिर

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर मर्चंटस् असोसिएशन, टॅक्स बार असोसिएशन व श्रीरामपूर तालुका सिडस् फर्टिलायझर डिलर्स यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ता. १७ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आझाद मैदान, मेनरोड येथील आगाशे सभागृहामध्ये जीएसटी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मर्चंटस् असोसिएशनचे अध्यक्ष राहुल रमेश कोठारी व सचिव संजय कासलीवाल यांनी दिली. जीएसटी कायद्यामध्ये शासनाने वेळोवेळी नव्याने केलेल्या बदलांबाबत तसेच दैनंदिन व्यवहारामध्ये येणाऱ्या अडचणींबाबत आयोजित करण्यात आलेल्या या मार्गदर्शन शिबिरामध्ये विक्रीकर न्यायाधिकरणाचे सदस्य सुमेरकुमारजी काले व नाशिकचे सीए दिनेश बुरड हे व्यापारी, उद्योजक, कारखानदार आदींना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती टॅक्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष बिहाणी व श्रीरामपूर तालुका सिडस् पेस्टीसाईडस् व फर्टिलायझर्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल उंडे यांनी दिली. आगाशे सभागृहामध्ये होणाऱ्या या जीएसटी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचा लाभ व्यापाऱ्यांनी उपस्थित राहून घ्यावा, असे आवाहन मर्चंटस् असोसिएशनचे अध्यक्ष राहुल रमेश कोठारी, उपाध्यक्ष अनिल लुल्ला, सचिव संजय कासलीवाल, सहसचिव नंदु कोठारी व संचालक मंडळ तसेच टॅक्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष बिहाणी व फर्टिलायझर्स असोसिएशनचे अध्यक्ष राहुल उंडे व असोसिएशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# आजपासून सावित्री ज्योती महोत्सवाला प्रारंभ

**अहमदनगर । रयत समाचार**

गुलमोहर रोड, सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यालयात आजपासून शनिवार, ता. १७ जानेवारी सावित्री ज्योती महोत्सवाला प्रारंभ होत असून नगरकरांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य संयोजक तथा जय युवा अकॅडमीचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे यांनी केले आहे. अहिल्यानगर महापालिका, जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर बार असोसिएशन, समाजकार्य महाविद्यालय व विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून बचत गटांच्या वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली आहे. चार दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनात विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार असून उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश योगेश पैठणकर व धर्मदाय उपायुक्त नवनाथ जगताप यांच्या हस्ते होणार आहे. महोत्सवात हातसडी तांदूळ, गावरान तूप, मसाले, पेढे, कडधान्ये, आयुर्वेदिक उत्पादने, पूजा साहित्य, पापड, लोणची, चटण्या, ज्वेलरी, वस्त्र, स्किन केअर, खेळणी, पर्स आदी विविध स्टॉल असणार आहेत. तसेच मॅरेज ब्युरो वधू-वर नोंदणीही होणार आहे. महोत्सवाचे हे दहावे वर्ष असून मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बीड, हिंगोली, नांदेड आदी ठिकाणच्या बचत गट व महिला लघुउद्योगांचे स्टॉल येथे असणार आहेत.

# धोकादायक विजेचे खांब हटवा

## जय हिंद फाउंडेशनची मागणी

**नगरतालुका । रयत समाचार**

जेऊर-कोल्हार रस्त्याच्या दुतर्फा सध्या विद्युत वाहक तारांचे खांब बसविण्याचे काम सुरू असून, हे खांब रस्त्यालगत अतिशय कमी अंतरावर उभारण्यात येत असल्याने प्रवाशांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर जय हिंद फाउंडेशनच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देत सदर खांब रस्त्यापासून किमान १० फूट अंतरावर हलविण्याची तातडीची मागणी करण्यात आली आहे. जेऊर येथील वाघवाडी परिसरातील डोंगरावर शासनाच्या माध्यमातून सोलर प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पातून निर्माण होणारा विद्युत प्रवाह जेऊर सब-स्टेशनला जोडण्यासाठी विद्युत खांब व मुख्य विद्युत वाहक तारा टाकण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. मात्र, हे खांब डांबरी रस्त्यापासून अवघ्या तीन फूट अंतरावर बसविण्यात येत असल्याने वाहनचालक, दुचाकीस्वार, पादचारी तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या खांबांवरून मोठ्या क्षमतेच्या विद्युत वाहक मुख्य तारा ओढल्या जाणार असल्याने भविष्यात एखादा अपघात घडल्यास मोठी जीवितहानी होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः रात्रीच्या वेळी, वळणाच्या ठिकाणी किंवा पावसाळ्यात अशा खांबांमुळे अपघाताचा धोका अधिक वाढणार आहे. याशिवाय या रस्त्याच्या रुंदीकरणाचा प्रस्तावही संबंधित विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीत



रस्त्यालगत उभारलेले विद्युत खांब पुढील काळात मोठा अडथळा ठरू शकतात. त्यामुळे संभाव्य धोके लक्षात घेता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून तातडीने उपाययोजना करून हे खांब रस्त्यापासून सुरक्षित अंतरावर हलविण्यात यावेत, अशी मागणी जय हिंद फाउंडेशनने केली आहे. या मार्गावरून वाघवाडी, बहिरवाडी, उदरमल, कोल्हार, चिचोंडी शिराळ, शेवगाव व पाथर्डी आदी भागांकडे जाणाऱ्या हजारो शेतकरी बांधवांची, विद्यार्थी व नागरिकांची दररोज मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. त्यामुळे या रस्त्यावरील सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. खांब तातडीने काढण्यात न आल्यास व भविष्यात या ठिकाणी कोणतीही जीवितहानी झाल्यास संबंधित विद्युत कंपनी जबाबदार राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. ही मागणी शिवाजी पालवे, राजू दारकुंडे, शिवाजी गर्जे, मदन पालवे, पोपट पालवे, संदीप जावळे व संजय येवले यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज : प्रा. डॉ. एन डी पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा. डॉ. एन डी पाटील यांचा आज चौथा स्मृतिदिन. चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा. डॉ. एन डी पाटील यांचे निधन झाले होते. त्यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा. डॉ. एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. (१९६२) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा. डॉ. एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा. डॉ. एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा. डॉ. एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा. डॉ. एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले.

प्रा. डॉ. एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा. डॉ. एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ. एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# मतदारांच्या नजरेतून लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून प्रसारमाध्यमे नापासच

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत यंदा पहिल्यांदाच बहु-सदस्यीय प्रभाग पद्धतीने मतदान होणार असल्याचा अत्यंत महत्त्वाचा बदल झाला. हा बदल प्रत्येक मतदाराच्या मतदान प्रक्रियेवर थेट परिणाम करणारा आहे. अशा वेळी नागरिकांना समजावून सांगणे, जनजागृती करणे आणि लोकशाहीचे भान वाढवणे ही जबाबदारी मुख्यत्वे प्रसारमाध्यमांची मानली जाते. प्रसारमाध्यमांना लोकशाहीचा चौथा स्तंभ हे बिरूदही याच कारणाने दिले गेले आहे. परंतु यंदा हा चौथा स्तंभ लोकशाहीच्या परीक्षेत पूर्णपणे नापास ठरला, हे स्पष्टपणे दिसून आले. गेली दोन-अडीच महिने टीव्ही चॅनेल्सवर २४ तास राजकीय चर्चांचे दळण चालू होते. पण प्रत्यक्षात सर्वात महत्त्वाचा असणारा बहु-सदस्यीय प्रभाग पद्धतीचा बदल मतदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी कोणतेही अभियान, जनजागृती माध्यमांनी राबवलेली नाही. फक्त मतदानाच्या दिवशी ''मतदान करा, लोकशाही बळकट करा'' अशा एका ओळीच्या घोषणांनी ते आपली जबाबदारी पूर्ण झाल्याचे समजत असतील; परंतु अशी वरवरची आवाहने लोकशाहीच्या बळकटीकरणाला पुरेशी ठरत नाहीत. ''लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य'' हा लोकशाहीचा मूळ गाभा असला तरी बहु-सदस्यीय प्रभाग पद्धत सुरु करण्यामागचे नेमके उद्दिष्ट कोणते? या बदलाचा नेमका कोणता फायदा महापालिकेच्या कारभाराला होणार आहे? जर ''बहु-सदस्यीय पद्धत'' महानगरपालिकांच्या दृष्टीने पूरक असेल तर मग मुंबई महानगरपालिकेला त्यातून वगळण्यामागे नेमका अर्थ कोणता? ४ सदस्यांचा प्रभाग केलेला असल्याने आगामी काळात पूर्वीचे वार्ड होते त्या त्या भागापुरताच निवडून येणाऱ्या नगरसेवकाचा हक्क राहणार आहे की ४ ही वॉर्डमधील विकासात त्याचा सहभाग असणार आहे? या सर्व बाबी अजूनही गुलदस्त्यातच आहे. या व्यवस्थेला लोकशाही संबोधणे कितपत संयुक्तिक ठरते? यावर एका शब्दाने प्रसारमाध्यमांनी भाष्य केलेले नाही. अशी माध्यमे लोकशाहीचा चौथा स्तंभ कसा असू शकतो? एकाच वेळी चार मतदान करणाऱ्या प्रक्रियेबाबत मतदारांमध्ये प्रचंड संभ्रम दिसून आला. मतदारांमध्ये संभ्रम असल्यानेच व त्यांचे योग्य ते समुपदेशन केले गेले नसल्याने प्रत्यक्ष मतदान करताना त्यांना वेळ लागत होता व त्यामुळेच केंद्राबाहेर रांगा लागलेल्या दिसल्या. मतदान केंद्रांत गोंधळ, वेळेची नासधूस, लांबच लांब रांगा याचे प्रमुख कारण म्हणजे योग्य ती जनजागृती न होणे. निवडणूक आयोगाकडूनही मतदान केंद्रावर दर्शनी फलकांद्वारे वर उमेदवारांची मांडणी कशी असेल याची प्राथमिक माहिती देणे आवश्यक होते. परंतु तेही करण्यात आले नाही. ''सतराशे लुगडी तरी भागुबाई उघडी'' या म्हणीप्रमाणे निवडणूक आयोगाची कार्यपद्धती या निवडणुकीतून उघडी पडली. वर्षानुवर्षे निवडणुका घेत असूनही निवडणूक व्यवस्थेत आवश्यक सुधारणा होत नाहीत, हेच यंदाही दिसून आले. प्रसारमाध्यमे दिशा देण्याऐवजी लोकशाहीची दशा करत आहेत हेच टीव्ही वाहिन्यांवरील गेल्या २ महिन्यातील वृत्तांकनातून अधोरेखित झाले. लोकशाही बळकट करण्यासाठी माध्यमांकडून अपेक्षित असलेली दिशा देणारी, मार्गदर्शक वृत्तांकन न करता, राजकीय नेत्यांच्या बिनमहत्त्वाच्या बातम्यांना दिलेले कृत्रिम प्राधान्य अधिक धोकादायक आहे. दिशाहीन लोकप्रतिनिधींची वाचाळता आणि सत्तेसाठी वाट्टेल ते अशा कुरघोडी दाखवण्यात माध्यमे धन्यता मानताना दिसली. परंतु लोकशाहीला दिशा देणाऱ्या महत्त्वाच्या सुधारणांवर प्रसारमाध्यमातून पूर्ण शांतता दिसली. या पार्श्वभूमीवर भविष्यात प्रसारमाध्यमांकडून लोकशाही विकासासाठी नागरिकांनी अपेक्षा ठेवाव्यात की नाही, याबद्दल गंभीर प्रश्न उभा राहतो. लोकशाही फक्त मतदारांवर नाही, तर चौथ्या स्तंभावरही तितकीच उभी आहे. आणि तोच स्तंभ दिशाहीन होत भरकटल्यास लोकशाहीची इमारत किती दिवस स्थिर राहील? हा प्रश्न निर्माण झालेला आहे. किमान भविष्यात तरी प्रसारमाध्यमांनी ज्या ज्या कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत सहभाग घेतलेला आहे, त्यांच्याकडून प्रक्रियेतील त्रुटी व मतदान प्रक्रिया अधिकाधिक मतदाराभिमुख होईल यासाठीच्या उपाय योजनांवर विचारमंथन घडवून आणावे.



सुधीर लक्ष्मीकांत दाणी
नवी मुंबई
९८६९२२६२७२

**प्रासंगिक**

(प्रवर्तक, सजग नागरिक मंच)
alertcitizensforumnm@gmail.com

# थकीत वेतनावरून 'शिक्षक भारती' आक्रमक; 'शिक्षण आयुक्तालया'वर आक्रोश मोर्चाचा इशारा

**अहमदनगर । रयत समाचार**

गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेली न्यायालयीन प्रकरणे आणि शिक्षकांची थकीत वेतन देयके अदा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या प्रशासनाविरोधात 'शिक्षक भारती' संघटना आक्रमक झाली आहे. नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शिक्षण संचालक महेश पालकर यांच्याशी दूरध्वनीवरून सविस्तर चर्चा केली. प्रशासकीय दिरंगाईमुळे शिक्षकांवर होणारा अन्याय आता सहन केला जाणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला. 'शिक्षक भारती' संघटनेच्या निवेदनानुसार, मा. उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही गेल्या दोन वर्षांपासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची थकीत देयके रोखून धरली आहेत. शिक्षण संचालकांनी १३ जून २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार ५ जुलै २०२५ पर्यंत ही देयके शाळास्तरावरून ऑनलाइन अपलोड करणे बंधनकारक होते. मात्र, आजही ही देयके शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अहिल्यानगर व वेतन अधीक्षक (माध्यमिक) कार्यालय, अहिल्यानगर येथे प्रलंबित असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले. संघटनेच्या शिष्टमंडळाने १६ जानेवारी रोजी आमदार सत्यजित तांबे यांची भेट घेऊन शिक्षण विभागाच्या ढिसाळ कारभाराबाबत माहिती दिली. यावेळी आमदार तांबे यांनी तत्काळ शिक्षण संचालक महेश पालकर यांच्याशी संपर्क साधून वस्तुस्थिती मांडली. न्यायालयाने आदेश देऊनही प्रशासन दोन वर्षे विलंब का लावत आहे, असा सवाल करत त्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालण्याच्या सूचना केल्या. प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे शिक्षकवर्गात तीव्र असंतोष पसरला असून परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी तोडगा काढण्याची मागणी त्यांनी केली. यापूर्वी १४ ऑक्टोबर २०२५ रोजी शिक्षक भारतीच्या वतीने शिक्षण संचालक कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनाने मार्च २०२५ अखेरपर्यंत सर्व देयके अदा करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र ते पाळले गेले नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाला स्थानिक स्तरावर दुर्लक्ष होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. जानेवारी २०२६ अखेरपर्यंत जर सर्व न्यायालयीन थकीत देयके मिळाली नाहीत, तर शिक्षक भारती संघटना शिक्षण आयुक्तालय, पुणे येथे प्रचंड आक्रोश आंदोलन करणार आहे, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी पुणे विभागाचे कार्याध्यक्ष प्रा. महेश पाडेकर, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष प्रा. रामराव काळे, विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीच्या राज्याच्या महिला अध्यक्ष रूपालीताई कुरुमकर, जिल्हा संघटक चंद्रशेखर हासे, सोपान कोरडे, गंगाराम साबळे, डॉ. अनिल धीवर, रामदास मुर्तडक यांच्यासह अन्य पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नगरचा मावा : 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष

**नेवासा । विजय खंडागळे**

अहिल्यानगर जिल्ह्याची ओळख ही संतांची भूमी, सहकाराचे जाळे आणि स्वातंत्र्यलढ्यातील देदीप्यमान वारसा असलेला जिल्हा अशी आहे. मात्र, दुर्दैवाने आज याच जिल्ह्याच्या प्रतिमेला मावा आणि गुटखा तस्करीचा काळा डाग लागत आहे. सोनई, शनिशिंगणापूरसह जिल्ह्यातील कानाकोपऱ्यात आज सुगंधी सुपारी आणि प्रतिबंधित गुटख्याची विक्री छुप्या मार्गाने नव्हे, तर चक्क खुलेआम सुरू आहे.

या जीवघेण्या व्यवसायातून दरमहा कोटींची उलाढाल होत असताना, अन्न व भेसळ प्रशासन (FDA) मात्र कुंभकर्णी झोपेत असल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने सर्वात मोठा असलेला हा जिल्हा आज एका वेगळ्याच संकटात सापडला आहे. गल्लीबोळातील टपऱ्यांवर मिळणारा मावा आणि गुटखा केवळ व्यसन उरलेले नसून, तो तरुणाईसाठी स्लो पॉयझन ठरत आहे. अनेक कोवळ्या वयातील मुले या विळख्यात अडकली असून, यामुळे होणाऱ्या कॅन्सरसारख्या दुर्धर आजारांनी अनेक संसार उघड्यावर आले आहेत. जिल्ह्याच्या पुरोगामी विचारांना ही व्यसनाधीनता पोखरून काढत आहे. सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, जर बंदी असलेल्या मालाची विक्री सर्वत्र उघडपणे होत आहे, तर अन्न व भेसळ प्रशासनाचे डोळे मिटलेले का आहेत? कायद्याने बंदी असलेल्या गुटख्याची साखळी तोडणे प्रशासनासाठी अशक्य नाही. मात्र, कारवाईचा केवळ फार्स केला जातो किंवा तक्रार आल्यावर नावापुरती धाड टाकली जाते.

या अर्थपूर्ण शांततेमुळेच तस्करांचे मनोबल उंचावले असून, त्यांना कायद्याचा धाक उरलेला नाही, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. केवळ कागदावर अहवाल सादर करून किंवा मोठ्या माशांना सोडून किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करून हे संकट टळणार नाही. प्रशासनाने या तस्करीचे रॅकेट शोधून काढणे गरजेचे आहे. जर अन्न व औषध प्रशासन विभागाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली, तरच अहिल्यानगर जिल्ह्याला या व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढता येईल. अन्यथा, हा ऐतिहासिक जिल्हा गुटखा हब म्हणून ओळखला जाण्यास वेळ लागणार नाही. लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यात तात्काळ लक्ष घालून या तस्करांच्या मुसक्या आवळाव्यात, हीच सामान्य जनतेची रास्त अपेक्षा आहे.




# अशोक महाविद्यालयात प्लेसमेंट कॅम्पस इंटरव्ह्यू; ४४ विद्यार्थ्यांच्या मुलाखती

**बेलापूर । शफीक बागवान**

माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली कला,वाणिज्य व विज्ञान महाविदयालय आणि प्रवरा हेल्थ केअर रिमीडीज लिमीटेड श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत मुलाखतीत बिजनेस असिस्टंट,बिजनेस मॅनेजर,सेल्स एझिक्यूटीव,ऑफीस असिस्टंट,मिडीया मॅनेजर अशा २९ पदासाठी मुलाखती घेण्यात आल्या. त्यामध्ये महाविद्यालयातील एकूण ४४ विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या.या मुलाखती घेण्यासाठी प्रवरा हेल्थ केअर रेमीडीज लिमीटेड कंपनीचे संचालक वैभव ढुस, योगेश पतंगे,प्रणव लोळगे,प्रसाद ढुस,रुषिकेश शिरसाट,आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सुनीता गायकवाड,उपप्राचार्य सुयोग थोरात,प्लेसमेंटसेलचे समन्वयक प्रा.स्वप्नील लांडगे, सह समन्वयक प्रा.शरद आवारी, आयक्यूएसी चेअरमन प्रा.संगीता खंडिझोड इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शरद आवारी यांनी केले.तर सूत्रसंचालन प्रा.स्वप्निल लांडगे यांनी केले.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक बाबासाहेब पटारे,प्रा. सुधीर शेरकर,प्रा.वैभव गायकवाड, प्रा. हर्षल दौंड.प्रा.ज्ञानेश्वर खिलारी,प्रा.शहाबुद्दीन शेख,डॉ. संदीप सांगळे,प्रा.योगेश राऊत,प्रा. नानासाहेब शिरोळे, प्रा.नवनाथ नागुडे,प्रा.मंदा तांबे,प्रा. राणी पटारे,प्रा.पायल सुराणा,प्रा.हिना शेख,प्रा.अमृता गायके,प्रा.मोहिनी अल्हाट,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एनएसएस विद्यार्थ्यांच्या डोक्यात 'संस्कारांचे सॉफ्टवेअर' बसवते- डॉ. शेटे

## श्रमसंस्कार शिबिराचा उत्साहात समारोप

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ एक उपक्रम नसून राष्ट्रनिर्मितीचे संस्कार देणारी चळवळ आहे. विद्यार्थ्यांच्या मनात चांगले विचार, सामाजिक बांधिलकी आणि सकारात्मक जीवनमूल्यांची पेरणी एनएसएसच्या माध्यमातून होत असते, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध शिवव्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले.




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'शाश्वत विकासासाठी युवक : पाणलोट आणि पडिक जमीन व्यवस्थापन' या अभियानांतर्गत आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. डॉ. शेटे पुढे म्हणाले की, या शिबिरातून विद्यार्थ्यांना मिळालेले संस्कार हे कायमस्वरूपी असावेत. अहंकारमुक्त विचारसरणी, सकारात्मक दृष्टीकोन आणि समाजाप्रती जबाबदारीची भावना जोपासली तरच विद्यार्थी खऱ्या अर्थाने आनंदी व यशस्वी जीवन जगू शकतील. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांच्या डोक्यात चांगल्या संस्कारांचे 'सॉफ्टवेअर' बसवण्याचे काम करते, असे त्यांनी स्पष्ट केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सहसचिव मुकेश मुळे होते. त्यांनी समाजात वाढत चाललेल्या व्यसनाधीनतेबद्दल चिंता व्यक्त करत तरुणांनी व्यसनमुक्त जीवन स्वीकारावे, किमान महापुरुषांच्या जयंतीदिवशी तरी व्यसनापासून दूर राहावे, असे आवाहन केले. यावेळी संस्थेच्या सदस्या निर्मला काटे यांनी आपल्या मनोगतातून स्वयंसेवकांचे आणि आदर्श गाव वाघोलीचे विशेष कौतुक केले. सात दिवस चाललेल्या या श्रमसंस्कार शिबिरात स्वयंसेवकांनी गावातील स्वच्छता, स्मशानभूमी व मंदिर परिसराची साफसफाई, पथनाट्य, व्यायाम, कवायती, वृक्षलागवड तसेच झाडांना पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन व्यवस्था उभारणे असे विविध उपक्रम राबविले. कार्यक्रम अधिकारी डॉ. गोकुळ क्षीरसागर यांनी शिबिराचा सविस्तर अहवाल सादर करत शिबिरातून झालेल्या सामाजिक व पर्यावरणीय कामाची माहिती दिली.

या उपक्रमांना ग्रामस्थ, जिल्हा परिषद शाळा, सरपंच व उपसरपंच यांचे मोलाचे सहकार्य लाभले. समारोपप्रसंगी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या स्वयंसेवक, स्वयंसेविका व विविध गटांचा गौरव करण्यात आला. तसेच वाघोली गावाच्या वेबसाईटचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या वेबसाईटचे डिझाईन गावचे सुपुत्र ऋषी ब्राम्हणे यांनी केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे यांनी स्वागतपर मनोगतातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांचे अभिनंदन करत त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके, कार्यक्रम अधिकारी, प्राध्यापक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच १२५ स्वयंसेवक व स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन सोमेश्वर शेळके यांनी केले तर आभार डॉ. गहिनीनाथ शेळके यांनी मानले.